**शब्द सुमन....**



गुलाब लेणी लेऊन,
कुंडी सजली थाटात!
सुंदर फुले पाहून,
सकाळ हसली गालात!

करता प्रेम निसर्गावरी,
भावती ही विविध सुमने!
आनंदाला उधाण येई,
मनी स्फुरती शब्द सुमने!

शब्द सुमनांचा सडा पडता,
रुंजी घालती, काव्य मनी!
रसिकांची दाद मिळता,
अलगद उमटी, ते पानी!

निसर्ग आपला सगा सोयरा,
गुंतवून टाकी, तना मना...!

उधळूनी आपुला, खजाना पूरा,
बरसत राही, तो दिवाना!

रंगाचा तर पडे धबधबा,
सुवासांचा वाहे, मंद झरा!
पहाता होतो, आम्हा अचंबा,
तो सौंदर्याचा, अनोखा नजारा!

............**चित्रा मेहेंदळे**
camehendale@gmail.com